# आजोळ

"सुधाई, बाळाला आपण वरणाचं पाणी द्यायला सुरुवात करायची का?? बाळ ८ महिन्यांचं झालयं, त्याला आता पूरक अन्नाची गरज आहे, तुम्हाला काय वाटतं?? रमाच्या बोलण्यात तथ्य आहे, देऊया त्याला वरणाचं पाणी आणि मग ८/१० दिवसांनी छान गुरगुट्या भात सुरू करूया." सुधाई म्हणाल्या. आणि त्याप्रमाणे रमा त्यांची सून बाळाला चमच्याने ते पाणी पाजू लागली.

सुधाई आपल्या रूममध्ये आल्या. टेबलावर धनश्रीचा हार घातलेला फोटो बघून त्यांना गहिवरून आलं. त्यांची लाडकी धनू आता या जगात नाही, हे कठोर सत्य त्यांना अजूनही पचवता येत नव्हते. 'धनू-धनू बाळा का ग मुकाटीने सहन केलंस सगळं?? आम्हाला एका शब्दाने तरी बोलायचं, कांहीतरी नक्कीच केलं असतं. इतकं मोठं पाऊल उचललंस. बाळाला सोहमला आमच्या ओटीत घालून. कसं सहन केलंस पोरी?? एवढे अत्याचार आजच्या या काळात - सासुरवास तर होत होताच... इतके कसे पैशाचे लोभी?? पण धनंजयची पण तुला साथ नव्हती?? अगं, प्रेमविवाह होता नं तुमचा?? तेव्हा कीती सालस वाटला धनंजय - पण ते तेवढ्यापुरतंच - दाखवण्यासाठी वागला का तो? आयुष्याचा एवढा मोठा निर्णय चुकला म्हणून ही शिक्षा करून घेतली स्वतःला. तू सोबत असतीस नं तर सगळे मिळून त्यांना धडा शिकवला असता किंवा आपल्या जीवनातून रद्दीसारखं बाहेर काढून टाकलं असतं!! पण बोलायचंस तर खरं!! असं म्हणून टेबलावर डोकं ठेवून त्या रडू लागल्या. सुधाकरराव त्यांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांची समजूत घालू लागले. ते तरी काय बोलणार? सगळे शब्दच संपले होते. उगाचच चौघेही एकमेकांना धीर देत होते.

AIT Global India Pvt. Ltd.

(२)

सोहमाला झोपवून रमा त्यांच्याजवळ आली. ती पण इकडचं तिकडं बोलून त्यांचं मन हलकं करण्याचा प्रयत्न करू लागली. राघव त्यांचा मुलगा बहिणीच्या या धक्कादायी निधनाने सुन्न होवून गेला होता. तो तर नुसताच बघत उभा होता. या अशा अवघडलेल्या दिवसात त्याच्या ६ आणि ४ वर्षांच्या मुलांवर परिणाम व्हायला नको म्हणून रमाराघवने अद्वैत आणि आरतीला रमाच्या माहेरी पोहचवून दिले होते.

धनु राघवची लाडकी बहीण !! लहानपणापासूनच त्यांचे आयुष्य सुखसमाधानात गेले होते. सुधाईने त्यांच्यावर संस्कारही चांगलेच केले होते. हसतखेळत ते कधी मोठे झाले ते कळलेही नाही. पुढील शिक्षणासाठी राघव बंगलोरला गेला - शिक्षण नोकरी तिथेच मिळाल्यामुळे तो बंगलोरलाच राहयचा. धनश्री फीजिओथेरपीस्टच्या डिग्रीच्या मागे होती. कॉलेजमध्ये जातायेतांना अचानकच पुन्हा तिची धनंजयशी भेट झाली - आणि प्रथमदर्शनीच ते एकमेकांच्या प्रेमात पडले. धनश्रीचे अजून २ वर्षे बाकी होती. धनंजयला तर नोकरी- बिझीनेस करण्याची गरजच नव्हती - पुष्कळ गडगंज संपत्ती त्याच्याकडे होती शिवाय त्याच्या वडीलांची राजकारणातही वरपर्यंत पोच होती. त्यामुळे पुढची ती २ वर्षे त्यांनी एकमेकांसोबत भेटण्यात - वाट पाहण्यात घालवली. शेवटी परिक्षा झाल्याबरोबर धनश्रीने घरी आईबाबांना धनंजयबद्दल सांगून त्याच्याशीच लग्न करायचे असा हट्ट धरला. लेकीच्या बालहट्टापुढे आईबाबांनी हात टेकले - थोडी जुजबी चौकशी करून, ब्रह्मदेवानेच यांची लग्नगांठ बांधली असे समजून आनंदाने लग्न करून दिले.

लग्नात सासरे म्हणाले, आम्हाला फक्त मुलगीच द्या पण लग्न मात्र आमच्या इतमानाला शोभेल असेच करा. म्हणजे कस आणि काय काय करायचे असे राघवने

AIT Global India Pvt. Ltd.

धनंजयला विचारले, तेव्हा तो म्हणाला, 'माझ्या भावाचं लग्न झालं होतं तेव्हा त्याला त्याच्या सासऱ्यांनी हुंडा, सोनं, गाडी, आणि फ्लॅट शिवाय आणखी मानपान म्हणून काय काय दिलं होतं तेवढंच तुम्हीही करा. तुम्हाला धनुची काळजी करण्याचं कारणच नाही. पण मी माझ्या बाबांच्या शब्दाबाहेर नाही जाऊ शकत' ठीक आहे म्हणून राघव आणि बाबांनी मोठ्या थाटामाटात धनुचे लग्न लावून दिले. रमावहिनीने अगदि मैत्रिणीसारखी तिची काळजी घेतली होती. धनु खुश तर घरातील सगळे खुश !! आणि धनु सासरी गेली... सगळं स्वप्नवतच वाटत होतं सगळं !!

इकडे बंगलोरला रमाराघवचा संसार बहरला. अद्वैत- आरतीच्या आगमनाने सुधाकरराव आणि सुधाई कधी इकडे तर कधी बंगलोरला रहू लागल्या. धनुशी संबंध तसे कमीच झाले. असो नव्या नवलाईत रमली असेल अशी स्वतःची समजूत घालत आणि अधून मधून तिला आईबाबा फोन करत. पण धनु फारच मोघम बोलायची. तिच्या सासरी पण त्यांना कधीच बोलावलं नव्हतं. पण जाऊ दे. मुलगी तर सुखात आहे नं ? हा विचार ते करायचे. लग्नानंतर ५ वर्षांनी धनुकडून गुडन्युज आली आणि आई बाबांना आनंद झाला. तिचं डोहाळजेवण, बाळंतपण रीतीप्रमाणे माहेरीच झालं. आणि एका छान दिवशी सुप्रभाती 'सोहमचे' बाळाचे आगमन झाले. धनु कुठल्यातरी दडपणाखाली आहे असे सुधाईंना वाटायचे. पण एवढ्या वर्षांनंतर बाळ होणार. सगळं व्यवस्थित होईल नं ?? असं तिला वाटत असेल. पण आता तर सगळं छान आहे. बाळही चांगलं गुटगुटीत अन् स्वस्थ आहे. बघता बघता ३ महिन्यांनी धनु बाळासह सासरी गेली.

धनुची तन्वी नावाची मैत्रीण होती. अगदि लहानपणापासूनच्या जिवलग सख्या होत्या दोघी !!

AIT Global India Pvt. Ltd.

तिच्याशी धनु मोकळेपणाने भरभरून बोलायची. तन्वीला कधी कधी वाटायचं धनु हा आनंदाचा बुरखा वरवर पांघरलं आहे. तिच्या मनात असं काहीतरी दुःख - शल्य आहे जे ती कोणालाच सांगु शकत नाही; मग माझ्याशी तरी बोलून मोकळी हो असं ती कळवळून धनूला म्हणायची. व्हीडीओवरच बोलणं होत होतं तरी मनातली चलबिचल तन्वीला तिच्या चेहऱ्यावर दिसायची.

खुप दिवसात धनुचा फोन नाही; बाईसाहेब बाळात मग्गुन झाल्या आहे वाटतं; म्हणून तिनेच फोन केला. आणि त्या रात्री धनूने जे कांही सांगितलं ते ऐकून तर तन्वीच्या पायाखालची जमीनच सरकली. धनूचा सासरी छळ होत होता, नवरा सुध्दा त्यात सहभागी होता. असा कसा बदलला तो, धनूला काहीच कळेना, आता तर सोहम सारखा गोड मुलगाही आहे पण त्याचमही फारसा लळा नाही है पण तिच्या लक्षात आलं. आणि हे सगळं आई बाबा दादा वहीनीला कसं सांगायच ?? या वयात त्यांना हा धक्का सहन होईल कां असं वाटून ती आजपर्यन्त बोलली नव्हती, पण तन्वी आता मला माझ्या आयुष्यात अंधार दिसतो आहे, म्हणून तुला सगळं सांगितले. पुढे कसबस बोलून धनूने फोन ठेवला.

तन्वीला काहीच समजेना, खुप खुप धक्का बसला. काका काकूंना कस सांगू आता ?? सांगायला तर पाहिजेच - मन घट्ट करून तिने त्यांना सांगितले. सगळं घर हादरून गेलं - राघवही बंगलोरहून आला - त्याला पुरता संताप आला होता की; तो म्हणाला मी आत्ताच्या आत्ता त्यांच्याकडे जातो व जाब विचारतो - सुधाकररावांनी त्याला कसेबसे शांत केले. आधी धनुशी व्यवस्थीत बोलू, ती काय म्हणते ते पाहू आणि मग ॲक्शन घेवू.

अशातच २/४ दिवस गेले. इकडे

AIT Global India Pvt. Ltd.
Aspire Intend Transform

धनंजयाला कळले की धनूने कोणाला तरी फोनवरून इथली खरी परिस्थिती सांगितली. आता आपले काही खरे नाही. त्याने त्याच्या आई वडीलांना सगळं सांगितलं, ते ही सगळं धनूच्या नकळत! आणि त्या तिघांनी मिळून एक प्लॅन केला. दूधात झोपेच्या गोळ्या टाकून अत्यंत प्रेमाने धनूला प्यायला देऊ लागला; पश्चात्ताप झाल्याचं सांगू लागला. साधी बिचारी धनू, त्याच्या बोलण्याला फसली. आणि त्याच्या हाताने दुधाचा प्याला पिवून रीकामा केला; धनंजय बाळाशी पण गोड बोलु लागला. थोड्या वेळात धनूची शुद्ध गेली आणि सकाळी सकाळी तिची प्राणज्योत मालवली !!

धनूने आत्महत्या केली असे सासरची मंडळी सांगु लागली. आई बाबा रमा राघव हतबलच झाले. आत्ता आत्ता आपल्याला खरी परिस्थिती काय हे कळलं. आणि लगेचच धनु आपल्याला सोडून गेली. नाही. नाही ती असं करुच शकत नाही. हा नक्कीच घातपातच आहे. त्यांनी पोलीसात तक्रार केली. सोहमकडे त्याची आत्या धनूची नणंद बघत होती. T.V वर प्रसार माध्यमातून एक एक गोष्ट उलगडू लागली. तिचा सासरी छळ होत होता हे सांगणारी एकमेव साक्षीदार म्हणजे तिची मोठी जाऊ !! तिने पोलीसांना खरी परिस्थिती सांगितली. इतकेच नाही तर या लोकांनी माझाही असाच छळ केला. म्हणून मागच्या वर्षीच मी विभक्त राहण्याचा निर्णय घेतला; माझ्याही चारित्र्यावर या लोकांनी शिंतोडे उडवले. मी थोडं वेगळं पाऊल उचललं म्हणून वाचली. अन्यथा माझीही धनश्रीसारखीच गत झाली असती. झालं कोर्ट कचेरी सुरु झाली. पैशाच्या जोरावर मिळणारे पुरावे, कसे खोटे आहेत हे सासरची मंडळी सिद्ध करु लागली. पोलीसही त्यांनाच मदत करतात असं लक्षात येत होतं.

AIT Global India Pvt. Ltd.
Aspire Intend Transform

शेवटी सोहमचा - बाळाचा ताबा धनश्रीच्या आई वडीलांनी मिळवला. ७/८ महिन्यांच इवलस ते लेकरू - त्याची होणारी फरफट थांबली. बाळाला चांगल सांभाळायच, हेच धनूला खरी श्रध्दांजली ठरेल असं ठरवून आजी - आबा - मामा - मामी यांनी दुधावरच्या या सायीला मनापासून जपायच ठरवलं. कोर्टाचा निकाल काहीही लागो. पण देवाकडे न्याय आहे, तोच त्यांना त्यांच्या या दुष्कृत्याची शिक्षा देईल; असं म्हणून सगळ्यांनी आपले दुःख बाजूला सारून सर्व लक्ष सोहमकडे केंद्रीत केलं. राघवने आपली बदली इथेच करून घेतली. आणि त्या सर्वांच्या मायेच्या पांघरूणाखाली निरागस, निष्पाप सोहम दिवसामासी वाढू लागला !!

सौ विजया पुरुषोत्तम जोशी

